**नियमित दिवाणी दावा क्र.३१/२०१५**
**अनंत वि. भिमराव व ईतर**

-:: **नि.क्र.११० लगत आदेश** ::-

वादीचे अधिवक्ता श्री. सोमवाड आणि प्रतिवादीचे अधिवक्ता श्री. बिरादार यांनी युक्तिवाद केला.

०२. मी प्रकरणाचे काळजीपूर्वक अवलोकन केले. दावा १० वर्षे जुना आहे. वादीने दि.०४/०३/२०२३ रोजी पुरावा बंद केला. त्यानंतर तीन तारखांनी प्रतिवादीने न्यायालयीन आयुक्त नेमण्याकरिता अर्ज निशाणी १०२ दाखल केला. सदर अर्ज दि.१८/१०/२०२५ रोजी नामंजूर झाला. प्रतिवादीने दि.०६/११/२०२५ रोजी पुरावा देण्यास कसूर केल्याने त्यांचा पुरावा बंद केला. दोन्ही पक्षांनी दि.२१/११/२०२५ व ०५/१२/२०२५ रोजी युक्तिवाद करण्यास कसूर केला.

०३. प्रतिवादीने सदर अर्जामध्ये दि.०६/११/२०२५ रोजीचा आदेश रद्द करण्यासाठी विनंती केलेली नाही. त्याचप्रमाणे प्रतिवादीने पुरावा दाखल करण्याची परवानगी मागितली, परंतु पुरावा दाखल केला नाही. त्यामुळे प्रतिवादीला दावा चालविण्याची किंवा त्यामध्ये पुरावा नोंदविण्याची प्रामाणिक ईच्छा नसल्याचे दिसून येते. सदर अर्जासोबत प्रतिवादीचा पुरावा नसल्याने फक्त परवानगी मंजूर केल्यास प्रकरण विनाकारण लांबणीवर पडेल. त्याआधारे विरुध्द पक्षास नुकसान होईल. सबब सदर अर्ज नामंजूर करण्यात येतो.

०४. आदेश संगणकावर टंकलिखित केला आणि खुल्या न्यायालयात घोषित केला.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by SHARAD AWADHUTRAO SURJUSE
Date: 2025.12.16 17:46:36 +0530

**ठिकाण – देवणी** **( श.अ. सुरजुसे )**

**दिनांक – १६–१२–२०२५** **दिवाणी न्यायाधीश क. स्तर,**

**देवणी.**